R.No. MHHMAR/25/A3029

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : १९

दि. २७ डिसेंबर २०२५, वार : शनिवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## भादा येथील जिप कन्या शाळेच्या नवीन इमारतीसाठी आ. कराड यांच्या प्रयत्नातून ९० लाखाचा निधी

लातूर- लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील मौजे भादा येथील जिल्हा परिषद कन्या शाळेच्या दुमजली नवीन वर्ग खोल्या बांधकामासह इतर तीन ठिकाणच्या जिप शाळेच्या विविध विकास कामासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून १ कोटी २५ लक्ष ३५ हजार रुपयांचा निधी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत २३ डिसेंबर २०२५ रोजीच्या आदेशान्वये मंजूर झाला आहे. सदरील निधी मंजूर झाल्याने भादा येथील कन्या शाळेचे रूपडे बदलणार आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील अनेक गावातील जिल्हा परिषद शाळेची दुरावस्था झाल्याने त्या ठिकाणी नव्याने वर्ग खोल्या बांधण्यात याव्यात त्याचबरोबर शाळेच्या परिसरात विकास कामे करण्यात यावीत याकरिता भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता.

आ. रमेशआप्पा कराड यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे लातूर ग्रामीण मतदार संघात असलेल्या औसा तालुक्यातील मौजे भादा येथील जिल्हा परिषद कन्या प्रशाला या शाळेच्या जुन्या वर्ग खोल्या पाडून त्याच जागेवर दोन मजली नवीन वर्ग खोल्या बांधणे, ग्रंथालय, प्रयोगशाळा, स्वच्छतागृह, विद्युतीकरण, यासह इतर नव्याने



बांधकाम करण्यात यावे यासाठी ९० लक्ष रुपयाचा निधी मंजूर झाला आहे. त्याचबरोबर लातूर तालुक्यातील मौजे जिल्हा परिषद प्रशाला अंकोली येथे नवीन दोन वर्ग खुल्या विद्युतीकरणासह काम करणे २१ लक्ष ८५ हजार, जिल्हा परिषद प्रशाला धानोरी येथे मुलींसाठी स्वच्छतागृह बांधकाम करणे ४ लक्ष ५० हजार आणि रेणापूर तालुक्यातील मौजे भोकरंबा येथील जिल्हा परिषद प्रशाला या शाळेची संरक्षण भिंत बांधकाम करण्यासाठी ९ लक्ष असा एकूण १ कोटी २५ लक्ष ३५ हजार रुपये रुपयाचा निधी मंजूर झाला आहे. भादा येथील शाळेचे बांधकाम व्हावे अशी मागणी अनेक दिवसापासून पालकाबरोबरच शालेय विद्यार्थ्यांची होती सदर शाळेच्या नवीन इमारतीसाठी लातूर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात मार्फत निधी मंजूर झाल्याने या शाळेची दुरावस्था नाहीशी होऊन अत्यंत देखणी इमारत उभी राहणार आहे.

जिल्हा परिषद शाळेत गोरगरीब, कष्टकरी, सर्वसामान्य कुटुंबातील मुले शिक्षण घेतात या विद्यार्थ्यांना चांगली इमारत आणि इतर शैक्षणिक सोई सुविधा मिळाव्यात यासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा सातत्याने प्रयत्न राहिला आहे. भादा येथील जिल्हा परिषद कन्या शाळेच्या नवीन इमारती बांधकामासह इतर शाळेच्या कामासाठी १ कोटी २५ लक्ष रुपयाचा निधी मिळवून दिल्याबद्दल भादा ग्रामस्थासह त्या त्या गावातील भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह पालकांनी आ. रमेशआप्पा कराड यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## नियोजित द्रुतगती मार्गात बदल करू नये-खा.रजनीताई पाटील

केज/प्रतिनिधी-नियोजित लातुर - कल्याण (जनकल्याण द्रुतगती मार्ग) या मार्गामध्ये बदल न करता लातुर - अंबाजोगाई -केज - बीड-जामखेड - अहिल्यानगर - कल्याण हाच मार्ग कायम ठेवण्याची मागणी खा. रजनीताई पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.



दिलेल्या पत्रात म्हटले आहे की,नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशना मध्ये आपण लातुर ते मुंबई हे अंतर सध्याच्या १० ते १२ तासांवरुन ४ ते ५ तासांत पुर्ण करण्याच्या उद्देशाने लातुर कल्याण (जनकल्याण द्रुतगती मार्ग) हा महत्वाकांक्षी द्रुतगती प्रकल्प जाहीर केला आहे. उपलब्ध माध्यमांव्दारे मिळालेल्या माहितीनुसार हा मार्ग लातुर कळंब - पारा - ईट - खर्डा - जामखेड - अहिल्यानगर - कल्याण असा करण्याचे अनेक माध्यमांव्दारे निवेदनात दिसुन येत आहे.

मात्र लातुर -अंबाजोगाई केज बीड-जामखेड -अहिल्यानगर - कल्याण हा मार्ग निश्र्चित करण्यात आलेला आहे. तो मार्ग तांत्रिक, भौगोलिक तसेच सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अधिक योग्य व लाभदायक आहे. सदर मार्गामुळे बीड व अहिल्यानगर जिल्ह्यातील मोठ्या लोकसंख्येला थेट संपर्क मिळतो. वाहतुक सुलभ होते व कृषी, व्यापारी व औद्योगिक दळणवळणास चालना मिळते. त्यामुळे मार्गात बदल केल्यास अपेक्षित लाभ कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्व बाबीचा विचार करता मार्ग न बदलता लातुर-अंबाजोगाई-केज बीड-जामखेड-अहिल्यानगर - कल्याण हाच नियोजित मार्ग कायम ठेवावा अशी मागणी करण्यात आली आहे.

## आठव्या धम्म परिषदे निमित्त लातूरमध्ये भव्य धम्म रॅली संपन्न

लातूर-अखिल भारतीय आठव्या बौद्ध धम्म परिषदेनिमित्त लातूरमध्ये भव्य धम्म रॅली आयोजित करण्यात आलेल्या भव्य धम्म रॅलीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट व समस्त लातूरकरांच्यावतीने या मंगलमय कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमांचे विधिवत पूजन, धम्म ध्वजारोहन आणि भिक्खू संघाच्या मंगल उपस्थितीत झाली. त्यानंतर भिक्खू संघाने उपस्थित उपासक-उपासिकांना त्रिसरण पंचशील दिले.

यानंतर बुद्धमूर्तीच्या साक्षीने हजारो उपासक-उपासिकांची शिस्तबद्ध व प्रेरणादायी धम्म मिरवणूक रॅली शहरातून मार्गस्थ झाली. धम्मघोष, शांतीचे संदेश आणि बौद्ध संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या या रॅलीमुळे संपूर्ण परिसर उत्साही वातावरणाने भारावून गेला.

देश-विदेशातून आलेल्या भिक्खूंच्या सहभागामुळे या धम्म परिषदेचे महत्त्व अधिकच वाढले असून, बौद्ध धम्माचा शांतता, करुणा व सद्भावनेचा संदेश समाजात प्रभावीपणे पोहोचला आहे.

सकाळच्या पहिल्या सत्रात स. ८ वाजता डॉ. आंबेडकर चौक, लातूर येथे पंचरंगी धम्म ध्वजारोहण करून बुध्द मुर्ती सहीत पू. भिक्खू संघ, बौध्द उपासक-उपासिका यांची भव्य धम्म मिरवणूक निघाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क, लातूर येथे मुख्य ध्वजारोहण करून मिरवणूकीचे समापन झाले. त्यानंतर महाविहार, सातकर्णी नगर, बार्शी रोड, रामेगाव येथे उदघाटन सत्रात अ. भा. भिक्खू संघ बुध्दगयाचे संघ नायक पू. भिक्खू करुणानंद महाथेरो (दिल्ली) यांच्या हस्ते आठव्या बौध्द धम्म परिषदेचे उदघाट्न संपन्न झाले. प्राचार्य डॉ. खेमधम्मो महाथेरो हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी सातकर्णी स्मरणीकेचे विमोचन संपन्न झाले. यावेळी विशेष अतिथी म्हणून प्रख्यात सिने अभिनेते गगन मलिक, माजी मंत्री तथा आ. अमित देशमुख, माजी मंत्री तथा आ. संजय बनसोडे आदि मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

याप्रसंगी भ. शरणानंद महाथेरो, भ. करुणानंद महाथेरो, भ. पय्यारतन थेरो, भ. महाविरो थेरो, भ. पय्याबोधी थेरो, भ. धम्मबोधी थेरो, भ. नागसेनबोधी थेरो, भ. सुमेध नागसेन थेरो, भ. सुभूती थेरो, भ. शिलरत्न थेरो, भ. संघपाल थेरो आणि इंदवंस आणि भ. इत्यादी भिक्खू संघ उपस्थित राहून विविध विषयानुरूप धम्म देशना दिली.

भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या प्रमुख संयोजनेखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. देवदत्त सावंत यांनी केले तर प्रास्ताविक केशव कांबळे यांनी केले.

या धम्म परिषदेला मराठवाड्यातील उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सहकार क्षेत्रातील मानाचा राज्यस्तरीय कैं. 'राजे विक्रमसिंह घाटगे' सर्वोत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार 'विलास' साखर कारखान्याला जाहीर

लातूर प्रतिनिधी :मांजरा परिवारातील विलास सहकारी साखर कारखाना (तोंडार, ता. उदगीर) या कारखान्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. सन २०२४-२५ या वर्षासाठीचा वसंतदादा शुगर इंन्टिटयुट, पुणे यांच्याकडून दिला जाणारा 'कै. राजे विक्रमसिंह घाटगे सर्वोत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार' विलास कारखान्याला जाहीर झाला आहे.









हा प्रतिष्ठित पुरस्कार श्री. छत्रपती शाहू सहकारी साखर कारखाना, कागल (जि. कोल्हापूर) यांनी पुरस्कृत केला असून, तांत्रिक उत्कृष्टतेच्या जोरावर विलास कारखान्याने सहकार आणि साखर उदयोगात आपला दबदबा पुन्हा एकदा सिद्ध केला आहे. सदरील पुरस्कार कारखान्याच्या वतीने वसंतदादा शुगर इंन्टिटयुट, पुणे येथे सोमवार दि. २९ डिंसेबर २५ रोजी वार्षीक सर्वसाधारण सभेत प्रदान करण्यात येणार आहे.

तांत्रिक उत्कृष्टतेची 'विलास' मोहोरराज्यातील साखर कारखानदारीतील तांत्रिक कार्यक्षमतेचे मूल्यमापन करून हा पुरस्कार दिला जातो. विलास कारखान्याने गेल्या हंगामात केलेली कामगिरी सरस ठरली आहे. या कामाची दखल घेऊन या पुरस्कारासाठी साखर कारखान्याची

निवड केली आहे. विलास कारखान्याने शून्य टक्के ब्रेकडाऊन, तांत्रिक (मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिकल) कारणास्तव कारखाना बंद राहण्याचे प्रमाण ०.०% राहिले आहे, जे अत्यंत उल्लेखनीय आहे. कारखान्याने १२.००% इतका दर्जेदार साखर उतारा मिळवला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत गाळप क्षमतेच्या वापरामध्ये १०.७४% ची वाढ झाली आहे. साखर तयार करण्यासाठी लागणाऱ्या वाफेचा वापर केवळ ३७.२६% (प्रति ऊस) इतका मर्यादित ठेवण्यात यश आले आहे.


मिलमधील ऊसाचा तंतुमय निर्देशांक ८५.२२% तर रिड्यूस्ड मिल एक्स्ट्रॅक्शन (ठचए) ९६.४७% राखले आहे. गत गळीत हंगामातील ही विलास कारखान्याची कामगिरी महत्वाची ठरली आहे. या कामाचे कौतुक करुन सहकार क्षेत्रातील मानाचा राज्यस्तरीय कै. 'राजे विक्रमसिंह घाटगे' सर्वोत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार 'विलास' साखर कारखान्याला जाहीर करण्यात आला आहे. या मानाच्या पुरस्काराचे स्वरूप मानचिन्ह, प्रशस्तीपत्र आणि रोख रक्कम असे आहे.

लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रेरणेतून आणि माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हा कारखाना प्रगतीपथावर आहे. संस्थापक चेअरमन माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख, माजी आमदार, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेचे चेअरमन धिरज विलासराव देशमुख आणि चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या कुशल नेतृत्वामुळेच उदगीर, जळकोट, अहमदपूर,चाकूर आणि शिरुरअनंतपाळ या भागातील शेतकऱ्यांच्या ऊसाचा प्रश्र्न सुटला असून त्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य आले आहे.

या यशाबद्दल सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख आणि चेअरमन वैशालीताई देशमुख यांनी कारखान्याचे व्हा. चेअरमन, माजी आमदार वैजनाथराव शिंदे, कार्यकारी संचालक ए.आर.पवार, कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील, सर्व अधिकारी, कर्मचारी, ऊस उत्पादक शेतकरी, ऊसतोडणी मजूर आणि वाहतूक कंत्राटदार या सर्वांचे मनापासून अभिनंदन केले आहे.

## स्वानंद सार्वजनिक वाचनालयात साने गुरुजी जयंती,पेरियार पुण्यतिथी, भारतीय ग्राहकदिन,संत गाडगेबाबा पुण्यतिथी, संताजी जगनाडे पुण्यतिथी संपन्न.

केज/प्रतिनिधी-स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता. केज जि.बीड येथे दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी साने गुरुजी जयंती, पेरियार ई.व्ही.रामासामी पुण्यतिथी,भारतीय ग्राहक दिन इत्यादी निमित्ताने व्याख्यान कार्यक्रम घेण्यात आला.यावेळी सर्वप्रथम सानेगुरुजी, पेरियार ई.व्ही.रामास्वामी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन करण्यात आले.त्यानंतर एस.के.वैरागे,बाळासाहेब गायकवाड,संभाजी लवटे यांची थोडक्यात व्याख्याने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाज सेवक,महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते प्राचार्य,डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच रामराजे गायकवाड, राजेभाऊ बोडखे,शिवाजी गायकवाड,नारायण गायकवाड,माऊली कदम यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद गायकवाड



यांनी केले. दि.२० डिसेंबर २०२५ रोजी संत गाडगेबाबा पुण्यतिथी साजरी करण्यात आली.सर्वप्रथम संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.यावेळी दादासाहेब गायकवाड, रामराजे गायकवाड यांची थोडक्यात व्याख्याने झाली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.यावेळी एम.बी. गायकवाड,नारायण गायकवाड,रमेशराव गायकवाड,संभाजी लवटे, शिवाजी गायकवाड, माऊली कदम,राजेभाऊ बोडखे,सिताराम वैरागे, बाळासाहेब गायकवाड, रविंद्र गायकवाड यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन आनंद गायकवाड यांनी केले. दि. १७ डिसेंबर २०२५ रोजी संताजी महाराज जगनाडे पुण्यतिथी साजरी करण्यात आली. सर्वप्रथम संताजी महाराज जगनाडे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.त्यानंतर बाळासाहेब गायकवाड, विरा सोनवणे,दिव्या साबळे यांनी गाथा वाचन केले.तसेच गंगाधर वैरागे, लक्ष्मी चौरे,कृष्णराजे गायकवाड,शौर्य गायकवाड यांनी ग्रंथ वाचन केले.अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, महाराष्टातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन,आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद गायकवाड यांनी केले.

## संपादकीय...

### महानगरपालिका निवडणूक : गल्लीसाठी मतदान की लोकशाहीच्या अस्तित्वासाठी?

महानगरपालिका निवडणूक ही अनेकांच्या दृष्टीने लहान निवडणूक असते. रस्ते, नाले, कचरा, पाणी, पथदिवे-या प्रश्नांपुरतेच आपण मतदान मर्यादित ठेवतो. आपल्या भागात दिसणारा, फोन उचलणारा, काम करणारा माणूस हा निकष केंद्रस्थानी ठेवतो. हा विचार पूर्वी योग्य होता; पण आजच्या राजकीय वास्तवात तो धोकादायकरीत्या अपुरा आहे.

कारण आज नगरसेवक हा केवळ स्थानिक प्रतिनिधी राहिलेला नाही. तो महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीसाठी मतदार आहे. म्हणजेच आपण निवडलेला नगरसेवक थेट राज्याच्या कायदेप्रक्रियेत सहभागी असतो. आपल्या एका मताचा परिणाम केवळ गल्लीपुरता न राहता संपूर्ण महाराष्ट्राच्या राजकारणावर होतो.

पण खरी समस्या इथेच सुरू होते. आज नगरसेवक स्वतंत्र विचार करणारा प्रतिनिधी राहिलेला नाही. पक्षाकडून दिला जाणारा व्हिप त्याची मान वाकवतो. कितीही प्रामाणिक, कर्तव्यदक्ष, चारित्र्यसंपन्न व्यक्ती असली, तरी पक्षादेश मोडण्याचे धाडस केल्यास तिचे नगरसेवकपद तत्काळ जाते. म्हणजेच आपण निवडलेली व्यक्ती नव्हे, तर पक्ष निर्णय घेतो. ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही.

याहून गंभीर बाब म्हणजे सत्तेचा आज होणारा वापर. केंद्रातील सत्ताधारी पक्ष विरोधी राज्य सरकारांना आर्थिकदृष्ट्या गुदमरवतो, कायदेशीर हक्काचे निधी अडवतो, ऋढ ची थकबाकी रोखतो आणि तपास यंत्रणांचा वापर राजकीय दबावासाठी करतो-हे आता आरोप राहिलेले नाहीत, तर उघड वास्तव झाले आहे.

सहयोगी पक्षांची अवस्था तर आणखी भयावह आहे. सत्तेसाठी तडजोड नाही, तर शरणागती दिली जात आहे. मतभेद मांडण्याचे स्वातंत्र्य संपले आहे. हा प्रवास लोकशाहीकडून हुकूमशाहीकडे जातो आहे, हे पाहण्यासाठी फार मोठा राजकीय अभ्यासक असण्याची गरज नाही.

अशा परिस्थितीत माझा नगरसेवक चांगला आहे एवढ्यावर मतदान थांबवणे म्हणजे वास्तवाकडे डोळेझाक करणे होय. आज मतदान करताना प्रश्न असा असायला हवा-

आपण सत्तेला प्रश्न विचारणाऱ्या बाजूला उभे आहोत की सत्तेसमोर मान झुकवणाऱ्या बाजूला?

आजच्या घडीला भारतीय जनता पक्ष ला प्रभावीपणे आव्हान देणारा राष्ट्रीय स्तरावरील पक्ष म्हणून भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हाच पर्याय शिल्लक आहे, ही वस्तुस्थिती आहे. काँग्रेस परिपूर्ण आहे, असा दावा नाही. पण लोकशाहीत प्रश्न विचारणारा, विरोध करणारा, सत्ता संतुलित ठेवणारा पक्ष असणे अत्यावश्यक असते. तोच पर्याय संपला, तर लोकशाहीही संपते.

मोठ्या उद्योगसमूहांच्या फायद्यासाठी धोरणे आखली जात असताना, सामान्य माणसाची बेरोजगारी वाढत आहे. तरुणांचे भविष्य अनिश्चित आहे. शिक्षण, नोकरी, महागाई-या सगळ्यांचा भार मध्यमवर्ग आणि गरीब नागरिकांवरच पडतो आहे. आणि तरीही आपण रस्ता झाला का? एवढ्यावर मतदान करणार असू, तर इतिहास आपल्याला माफ करणार नाही.

आज घेतलेला निर्णय केवळ नगरसेवक निवडण्यापुरता नाही. तो आपल्या मुला-नातवंडांना लोकशाही मिळणार की भीतीचे राज्य, हे ठरवणारा आहे. त्यामुळे भाजपचा पराभव होणे ही कोणत्याही एका पक्षाची गरज नसून, सर्वसामान्य भारतीय नागरिकांची तातडीची लोकशाही गरज आहे.

हा निर्णय नाईलाजाचा वाटू शकतो. पण लोकशाही वाचवण्यासाठी कधी कधी नाईलाजाने घेतलेले निर्णयच इतिहासात योग्य ठरतात. आज आपण गप्प बसलो, तर उद्या बोलण्याचाही अधिकार शिल्लक राहीलच, याची खात्री देता येणार नाही.


म्हणूनच, या महानगरपालिका निवडणुकीकडे हलक्याने पाहू नका.

हे मतदान गल्लीसाठी नाही-

हे मतदान भविष्यासाठी आहे.

## महाराष्ट्र भूषण राम सुतार श्रद्धांजली सभेचे उद्या दिल्लीत आयोजन

दिल्ली -जागतिक किर्तीचे शिल्पकार, महाराष्ट्र भूषण डॉ. राम वनजी सुतार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सभेचे आयोजन करण्यात आले आहे. ही सभा उद्या दि. २७ डिसेंबर रोजी भीम ऑडिटोरियम, डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर, १५ जनपथ, नवी दिल्ली येथे दुपारी ३ ते ५ वाजेदरम्यान होणार आहे. डॉ. सुतार यांचे गेल्या



आठवड्यात १८ डिसेंबर रोजी निधन झाले होते.डॉ. राम सुतार यांनी सात दशकांहून अधिक कारकीर्दीत शेकडो पुतळ्यांची निर्मिती केली. जगातील सर्वात उंच पुतळा म्हणून गौरविल्या जाणाऱ्या सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्टॅच्यू ऑफ युनिटी व्यतिरिक्त छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदी महापुरुषांची शिल्पे त्यांनी साकारली आहेत. त्यांच्या रचना भारतीय इतिहास आणि संस्कृतीचे अमर प्रतीक बनल्या आहेत. या सभेस कुटुंबीय, चाहते आणि कला प्रेमी उपस्थित राहणार आहेत, असे अनिल राम सुतार यांनी कळविले आहे.

# अरवली पर्वत,जंगल,वृक्ष,डोंगरदऱ्याचा भाग वाचविणे काळाची गरज अन्यथा पृथ्वीचा विनाश अटळ.

अरवली पर्वतांचे खनन खूप जुन्या काळापासून सुरू आहे, परंतु अवैध आणि मोठ्या प्रमाणावर होणारे खनन २००० च्या दशकाच्या सुरुवातीपासून मोठ्या प्रमाणात सुरू असल्याने चर्चेत आले, विशेषतः २००२ मध्ये अवैध खननाबद्दल तक्रारी आल्या आणि ऑक्टोबर २००२ मध्ये खनन थांबवण्याचे आदेश सरकारकडून दिले गेले. मुख्यत्वे करून प्राचीन काळापासून अरवली पर्वत ही पृथ्वीवरील सर्वात जुन्या पर्वतरांगांपैकी एक आहे ,असे सांगितले जाते की सुमारे २ अब्ज वर्षे जुनी अरवली पर्वत रांगा आहेत आणि खनिजे काढणे हे नैसर्गिकरित्या घडत असले तरी,आधुनिक काळातील बेकायदेशीर खनन मोठ्या प्रमाणात सुरू असल्याने अनेक जटील समस्या निर्माण झाल्या आहेत. २०२४-२०२५ सर्वोच्च न्यायालयाने नवीन खनन परवाने थांबवले आणि मार्च २०२४ मध्ये सीईसी ने वैज्ञानिक मॅपिंग आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन करण्याची शिफारस केली. नोव्हेंबर २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने १०० मीटरच्या व्याख्येवर पुनर्विचार केला, ज्यामुळे 'अरवली बचाव' मोहीम तीव्र झाली.अरवली पर्वतांचे खनन हे अनेक दशकांपासून सुरू आहे, परंतु अलीकडच्या काळात, विशेषतः २००२ नंतर, ते कायदेशीर आणि पर्यावरणीय वादामुळे खूप चर्चेत आले. दिल्लीपासून हरियाणा आणि राजस्थानमधून गुजरातपर्यंत सुमारे सातशे किलोमीटर पर्यंत पसरलेल्या अरवली पर्वतरांगा भारताचा नैसर्गिक किल्ला म्हणून ओळखल्या जातो म्हणजेच अरवली पर्वत भारताची अबाध्य ढाल आहे.अशा ऐतिहासिक, नैसर्गिक, सुरक्षित,प्राचीन, सांस्कृतिक भारताचा आत्मा अशा महाकाय अरवली पर्वताचे जर आपण अवैधरित्या खनन करीत असाल तर तीला हत्याच म्हणावी लागेल व येणारा काळ अक्राळविक्राळ रूप धारण करून सर्वत्र ओसाड दिसून येईल व पृथ्वीचा आणि निसर्गाचा विनाश झाल्याशिवाय रहाणार नाही.या पृथ्वीतलावर सर्वांनाच रहाण्याचा व जगण्याचा अधिकार आहे.परंतु बुध्दीजीवी मानवाने अतीरेक केला तर मानवाचा अंत तर होईलच सोबतच संपूर्ण मुक्या प्राण्यांचा पशुपक्षी,जीवजंतू, निसर्ग,स्थल,जल,वायु या सर्वांचा श्वास कोंडेल व एक वेळ अशी येईल की सर्वांनाच मृत्यू आपल्याकडे ओढेल आणि या पृथ्वीतलावर संपूर्ण जीवन लीला समाप्त होईल.त्यामुळे आज काळाची गरज आहे की वृक्ष, नदी, तलाव,पर्वतरांगा, डोंगरदऱ्याचा भाग यांना वाचविलेच पाहिजे. कारण खनन व वृक्षतोडीमुळे हवामानात आमुलाग्र बदल झालेला आहे आणि हा बदल एवढा झाला आहे की आपण त्याची कल्पना सुध्दा करू शकत नाही यामुळे सर्वत्रच प्रदुषणाचे सावट मोठ्या प्रमाणात दिसून येते.देशातील काही राज्यातील शहर प्रदुषणाच्या बाबतीत रेड झोनमध्ये आले आहेत आणि जगात प्रदुषणाच्या बाबतीत भारत अव्वल स्थानावर आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे. दिल्ली सारख्या राजधानीमध्ये प्रदुषणामुळे संपूर्ण दिल्लीमध्ये गॅसचेंबर सारखी परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून येते.हा संपूर्ण प्रकार औद्योगिकरण, शहरीकरण,जलप्रदूषण,खनन व निसर्गावर होत असलेल्या अत्याचारामुळे व अन्यायामुळे निर्माण झाला आहे.१९९० च्या दशकांपासून अरवली पर्वताच्या खननवर पर्यावरणीय निर्बंध लादले गेले आणि २००९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने फरिदाबाद,गुरूग्राम आणि मेवात जिल्ह्यामध्ये खाणकामावर बंदी घालण्यात आली होती. तरीही बेकायदेशीर खाणकाम अजूनही सुरू असल्याचे दिसून आले.यावरून स्पष्ट होते की गेल्या अनेक दशकांपासून अरवली पर्वताचे खाणकाम सुरूच आहे.यावरून स्पष्ट होते की खनन माफिया अरवलीच्या भोवताल सक्रिय आहेत.परंतु अरवली पर्वताच्या होत असलेले तिव्र आंदोलन व विरोध पहाता केंद्र सरकारने आंदोलनाच्या पार्श्र्वभूमीवर संरक्षित क्षेत्राचा विस्तार करण्यास सुरुवात केली आहे.२००९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने हरियाणातील काही जिल्ह्यांमध्ये खाणकामावर पूर्णपणे बंदी घातली होती.तरीही खनन माफिया सक्रिय असल्याने अवैधरित्या खनन करून अरवली पर्वतांना छिन्नविछिन्न करने सुरूच आहे. परंतु आता सरकारने अरवली पर्वताला वाचविण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहे याचे स्वागत.नोव्हेंबर २०२५ मध्ये पर्यावरण मंत्रालयाच्या नेतृत्वाखालील समितीच्या शिफारशीनुसार सर्वोच्च न्यायालयाने अरवली टेकड्या आणि अरवली पर्वतरांगा यांच्या एकसमान कायदेशीर व्याख्येचा स्वीकार केला.या व्याख्येनुसार अरवली टेकडीम्हणजे स्थानिक आसपासच्या भुभागापेक्षा किमान १०० मीटर उंचीची भूरचना आणि अरवली पर्वतरांगा म्हणजे एकमेकांपासून ५०० मीटरच्या आत अशा दोन किंवा अधिक टेकड्यांचा समूह असे निश्र्चित करण्यात आले आहे.मात्र या व्याख्याबदलामुळे अरवली क्षेत्राचा ९० टक्के भाग खान कामासाठी खुला होईल,असा आरोप आंदोलकांनी केला आहे.मात्र हा आरोप सरकारने नाकारला असुन अरवलीच्या संरक्षणास कटिबद्ध असल्याचा दावा सरकारने केला आहे.परंतु सरकारचा दावा कितपत सत्य आहे ही बाब पुढील काही काळात लक्षात येईल.सरकारने निसर्गाचा होत असलेला ह्यास पहाता महत्वपूर्ण अरवली पर्वताचे खनन पुर्णतः थांबविले पाहिजे.कारण आज अरवली पर्वताच्या रांगामुळे अनेक विनाशकारी दुर्घटना रोखण्यास मोठी मदत होते आहे व संपूर्ण जीव सृष्टीला मोकळा आणि आल्हाददायक वातावरण निर्माण करण्याचे काम अरवली पर्वताच्या माथ्यावर होत आहे. आज आपल्याला अती ऊन,अती पाऊस, सुनामी, भूकंप, ज्वालामुखीचा उद्रेक, ग्लेशियर वितळने, जलप्रदूषण, वायुप्रदूषण, अवकाळी पाऊस,वणवा लागने यावर जर मात करायची असेल तर अरवली पर्वतासारखे संपूर्ण पर्वत व डोंगरदऱ्या यांना वाचविणे काळाची गरज आहे.देशातील राज्य सरकारे व केंद्र सरकार विकासाच्या नावाखाली निसर्गाची खुलेआम कत्तल करीत आहे ही बाब देशातील १४० कोटी जनता उघड्या डोळ्यांनी पहात आहे आणि याचे उदाहरण सर्वांसमोर आहे. त्यामुळेच आज शहरात व गावात हिंसक प्राण्यांचा शिरकाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे आणि यामुळे देशातील अनेक राज्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असून मोठ्या प्रमाणात मानवीय व पाळीव प्राण्यांची हाणी होत आहे. सोबतच पाणी टंचाई,जंगलाला वनवा लागने, जंगलातील पशुपक्षांना खाद्यपुर्ती या जंगल तोडीमुळे न होणे या संपूर्ण गोष्टींना जबाबदार देशातील राज्य व केंद्र सरकार आहे. निसर्गाचा होत असलेला ह्यास पहाता सरकारने खनन परवाने वाटप पुर्णतः बंद केले पाहिजे, औद्योगिकरण,शहरीकरण,वाळू उत्खनन यावर अंकुश लावला पाहिजे व अरवली पर्वत रांगा वाचविण्यासाठी सरकारने युध्दपातळीवर प्रयत्न केले पाहिजेत कारण अरवली पर्वत रांगा ह्या भारताच्या सुरक्षेची ढाल आहे.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे एकनिष्ठ शिलेदार : कर्मवीर दादासाहेब गायकवाड

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत दादासाहेब गायकवाड यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. बाबासाहेबांच्या निधनानंतर दलित समाज दिशाहीन होऊ नये, त्यांच्या विचारांची ज्योत विझू नये, यासाठी जी जबाबदारी काही मोजक्या नेत्यांवर आली, त्यात दादासाहेब गायकवाड अग्रस्थानी होते. बाबासाहेबांचा त्यांच्यावर असलेला विश्र्वास हा केवळ वैयक्तिक नव्हता, तर वैचारिक प्रामाणिकतेचा पुरावा होता. भारतीय लोकशाहीच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की ज्यांनी सत्तेच्या प्रकाश झोतात राहण्यापेक्षा संघर्षाच्या अंधारात उभे राहणे पसंत केले. अन्याय, शोषण आणि सामाजिक विषमतेविरुद्ध आयुष्यभर लढा दिला. दादासाहेब गायकवाड हे असेच एक निर्भीड, निःस्वार्थ आणि तत्त्वनिष्ठ नेतृत्व होते. ते केवळ आंबेडकरांचा वारसा लाभलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे पहिले अध्यक्ष नव्हते, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक-राजकीय विचारांचे प्रामाणिक वाहक होते. तसेच पक्षाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य सुध्दा होते.

भाऊराव कृष्णराव गायकवाड ऊर्फ दादासाहेब गायकवाड यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९०२ रोजी नाशिक येथे झाला. ते भारतीय राजकारणी, समाजसेवक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे विश्र्वासू सहकारी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेल्या चळवळीत प्रगल्भ, विश्र्वसनीय व्यक्तिमत्व म्हणजे कर्मवीर दादासाहेब गायकवाड होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नेहमी म्हणत, माझ्या आत्मचरित्रात अर्धा भाग भाऊराव गायकवाड असणार आहे. तो नसला, तर माझे चरित्र पूर्ण होणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या म्हणण्यातच दादासाहेब गायकवाड यांचे आंबेडकरी चळवळीत व बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेल्या रिपब्लिकन पक्षातील महत्त्वाचे स्थान दिसून येते. बाबासाहेबांच्या अनेक कामांत दादासाहेबांचा सहभाग होता, अनेक आंदोलनांत आंबेडकरांना साथ त्यांनी दिली होती. समाजाविषयींचा त्यांचा कळवळा हा आंतरिक उमाळ्यातून आलेला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी येथील दलित जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी जो व्यापक संघर्ष सुरू केला त्या संघर्षात बाबासाहेबांना साथ देण्यासाठी सुरुवातीच्या काळात पुढे आलेल्या दलित युवकांपैकी कर्मवीर दादासाहेब गायकवाड हे एक होत.



२० मार्च १९२७ चा महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह आणि २ मार्च १९३० रोजी केला गेलेला नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, या सत्याग्रहांमध्ये त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या बरोबरीने भाग घेतला होता. या सत्याग्रहाच्या वेळी डॉ. आंबेडकरांना दादासाहेबांची खूप मदत झाली. अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशासाठी दादासाहेबांच्या नेतृत्वाखाली आणि बाबासाहेबांच्या पुढाकाराने दिलेल्या लढ्याचा एक भाग म्हणजे हा सत्याग्रह होता. काळाराम मंदिर हे नाशिक मधील प्रसिद्ध मंदिर आहे. डॉ. आंबेडकरांनी सुरू केलेल्या इतर चळवळींमध्येही त्यांचा सक्रिय सहभाग होता. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी झालेल्या आंदोलनात दादासाहेबांनी भाग घेतला होता. संयुक्त महाराष्ट्र समितीचे एक प्रमुख नेते म्हणून ते ओळखले जात होते.

बाबासाहेबांनी स्वप्न पाहिलेले रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हे केवळ राजकीय पक्ष नव्हते, तर दलित, वंचित, शोषित समाजाच्या आकांक्षांचे व्यासपीठ होते. बाबासाहेबांच्या निधनानंतर या पक्षाची धुरा दादासाहेब गायकवाड यांनी समर्थपणे सांभाळली. त्यांनी पक्षाला केवळ निवडणुकांचे साधन न बनवता, सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने संसदेत, रस्त्यावर आणि समाजमनात अन्यायाविरोधात आवाज बुलंद केला. सत्तेसाठी तडजोड करण्यापेक्षा स्वाभिमान, समता आणि सामाजिक न्याय यांना प्राधान्य देणे, हीच दादासाहेबांची राजकीय भूमिका होती. आजच्या राजकारणात जिथे सत्तेसाठी पक्ष, विचार आणि निष्ठा बदलल्या जातात, तिथे दादासाहेब गायकवाड यांचे जीवन हे तत्त्वनिष्ठतेचा जिवंत आदर्श ठरते. त्यांनी कधीही बाबासाहेबांच्या विचारांशी तडजोड केली नाही. राजकीय फायद्यांसाठी दलित समाजाच्या प्रश्नांवर सौदेबाजी केली नाही. त्यांचे राजकारण हे घोषणा-प्रधान नव्हते, तर संघर्षप्रधान होते. शिक्षण, रोजगार, जमीन, सन्मान आणि राजकीय प्रतिनिधित्व या मूलभूत प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने लढा दिला.

दुर्दैवाने, भारतीय राजकारणाच्या मुख्य प्रवाहाने दादासाहेब गायकवाड यांचे योगदान अपेक्षित प्रमाणात मान्य केले नाही. इतिहासाच्या पानांत त्यांचे नाव अनेकदा झाकोळले गेले. मात्र, ज्यांनी चळवळ जवळून अनुभवली, त्यांच्यासाठी दादासाहेब हे केवळ नेते नव्हते, तर विश्र्वासाचे प्रतीक होते. आज जेव्हा बाबासाहेबांच्या नावाचा वापर केवळ राजकीय सोयीसाठी केला जातो, तेव्हा दादासाहेब गायकवाडांचे जीवन आणि कार्य नव्या पिढीला आत्मपरीक्षण करायला भाग पाडते. दादासाहेब गायकवाड हे नाव म्हणजे संघर्ष, निष्ठा आणि सामाजिक न्यायासाठीचे अखंड समर्पण. ते रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे पहिले अध्यक्ष म्हणून इतिहासात अजरामर राहतीलच, पण त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे ते बाबासाहेबांच्या स्वप्नातील भारतासाठी झटणारे खरे रिपब्लिकन होते.

कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड पुरस्कार' हा महाराष्ट्र शासनाद्वारे २००२ पासून दिला जाणारा पुरस्कार आहे. दादासाहेबांच्या नावाने महाराष्ट्र राज्य सरकारची 'कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना' या नावाची एक योजना २००४ पासून आहे. २०१२ साली तिचा लाभ ३८ भूमिहीनांना झाला होता. मात्र त्यापूर्वी केवळ २५० लोकांना जमिनी मिळाल्या होत्या. भारत सरकारने गायकवाडांना १९६८ मध्ये 'पद्मश्री' हा हा किताब देऊन त्यांच्या सार्वजनिक कार्याचा व समाजसेवेचा गौरव केला होता. नाशिकमध्ये एका सभागृहाला 'दादासाहेब गायकवाड सभागृह' नाव दिले आहे मुंबईत अंधेरी (पश्र्चिम) भागात 'दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्र' नावाची संस्था आहे. तसेच दादासाहब गायकवाड यांचा परिचय करून देणारी एक १३ मिनिटांची 'डॉक्युमेंटरी फिल्म' सुध्दा आहे. भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाल्यावर त्या पक्षाचे नेतृत्व कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी केले. पुढे या पक्षाची फाटाफूट झाल्यावर त्याच्या एका प्रभावी गटाचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. रिपब्लिकन पक्षात ऐक्य निर्माण करण्यासाठी त्यांनी बरेच प्रयत्न केले; पण दुर्दैवाने त्यामध्ये त्यांना यश आले नाही. तथापि, दलित समाजातील सर्वांत मोठ्या गटाने गायकवाडांच्या नेतृत्वालाच मान्यता दिली होती.

१९३७ ते १९४६ या काळात गायकवाड मुंबई विधानसभेचे सदस्य (आमदार), तर १९५७ ते १९६२ या काळात लोकसभेचे सदस्य व राज्यसभा सदस्य, १९५७-५८ मध्ये ते लोकसभेत रिपब्लिकन पक्षाचे नेते होते. १९६२ ते ६८ दरम्यान ते राज्यसभेवर सदस्य (खासदार) म्हणून कार्यरत होते. लोकसभेचे सदस्य म्हणून कार्यरत असताना दुसरे सदस्य प्रकाशवीर शास्त्री यांनी धर्मांतराविरुद्ध विधेयक आणण्याच्या केलेल्या प्रयत्नाच्या निषेधार्थ त्यांनी लोकसभेत मनुस्मृती फाडून १९२७ मध्ये डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृतीचे दहन करून केलेल्या प्रतीकात्मक निषेधाची आठवण करून दिली. त्यांचा २९ डिसेंबर १९७१ मृत्यू झाला, २००१-०२ मध्ये महाराष्ट्र शासनाने त्यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करून त्यांच्या कार्याची स्मृती जागवली. आज गरज आहे ती त्यांच्या विचारांचा, त्यांच्या निर्भीड भूमिकेचा आणि त्यांच्या निःस्वार्थ राजकारणाचा वारसा पुढे नेण्याची. बाबासाहेबांचे विचार केवळ जयंती-पुण्यतिथीपुरते मर्यादित न ठेवता, त्यांना आचरणात आणणे हीच खरी आदरांजली आहे, हा संदेश दादासाहेबांच्या संपूर्ण जीवनातून मिळतो. दादासाहेबांच्या ५४ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या सामाजिक न्यायासाठीच्या संघर्षाला विनम्र अभिवादन!

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

# शेतकऱ्यांचा पहिला सेनापती आणि अपूर्ण राहिलेली कृषिक्रांती : डॉ. पंजाबराव देशमुख

भारतीय लोकशाहीच्या पहाटेच्या काळात, जेव्हा स्वातंत्र्याचा अर्थ केवळ राजकीय मुक्तता एवढाच मर्यादित होता, तेव्हा पंजाबराव देशमुख यांनी त्या स्वातंत्र्याला शेतकऱ्यांच्या शेतात, त्यांच्या कष्टात आणि त्यांच्या हक्कांत उतरवण्याचा ध्यास घेतला. भारतीय स्वातंत्र्यानंतरच्या इतिहासात अनेक मंत्री झाले, अनेक धोरणे आली; मात्र शेतकऱ्याच्या वेदनेला संसदेत नेऊन ती राष्ट्राची चिंता बनवणारा नेता विरळाच. अशा विरळ नेत्यांमध्ये अग्रक्रमाने घेतले जाते ते नाव म्हणजे डॉ. पंजाबराव ऊर्फ भाऊसाहेब देशमुख. ते केवळ भारताचे पहिले कृषिमंत्री आणि राजकारणी नव्हते, तर शेतीला अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू मानणारे दूरदर्शी विचारवंतआणि शेती, शिक्षण आणि सामाजिक न्याय यांचा त्रिवेणी संगम होते. विदर्भातील खेड्यापाड्यातील शेतकऱ्यांची दयनीय अवस्था, सावकारशाहीचा विळखा, शासनाच्या उदासीन धोरणांमुळे पिचलेला शेतकरी, या सगळ्यांना आवाज देणारा एक लढाऊ, निर्भीड आणि अभ्यासू नेता आणि कृषी शिक्षणाचा दीपस्तंभ म्हणजेच पंजाबराव देशमुख.

आज 'शेती हा उद्योग आहे' असे म्हणणे सोपे वाटते; मात्र स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या दशकांत ही भूमिका मांडणे म्हणजे राजकीय धाडस होते. पंजाबराव देशमुख यांनी शेतकऱ्याला दानाचा लाभार्थी नव्हे, तर अर्थव्यवस्थेचा कणा मानले. स्वातंत्र्याच्या पहिल्याच टप्प्यात पंजाबराव देशमुखांनी स्पष्ट भूमिका घेतली होती. शेती हा दयाभावाचा विषय नाही; तर तो राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतमालाला योग्य दर, हमीभाव, शेतमालाचे संरक्षण, साठवणूक व्यवस्था, कृषी शिक्षण आणि संशोधन आणि बाजारव्यवस्था या सगळ्या मुद्द्यांवर त्यांनी संसदेत सातत्याने ठाम आणि अभ्यासपूर्ण मते मांडली व आवाज उठवला. केंद्र सरकारचे पहिले कृषिमंत्री म्हणून त्यांनी भारतीय शेतीला धोरणात्मक दिशा दिली. त्या काळात औद्योगिकीकरणाच्या नावाखाली शेतीकडे दुय्यम नजरेने पाहिले जात असताना, पंजाबरावांनी शेतकऱ्याला केंद्रस्थानी ठेवणारी आर्थिक मांडणी केली. आज सरकार शेतकऱ्याला अनुदानाच्या जाळ्यात अडकवून त्याचा स्वाभिमान हिरावून घेत आहेत; पण पंजाबराव देशमुख शेतकऱ्याला अनुदानाचा नव्हे, तर हक्काचा लाभार्थी मानत होते.



आज कृषी अर्थसंकल्प वाढतो आहे, योजना जाहीर होतात; पण शेतकऱ्याच्या हातात काहीच टिकत नाही. बाजारपेठ दलालांच्या ताब्यात आहे, उत्पादन खर्च वाढतो आहे आणि जोखीम संपूर्णपणे शेतकऱ्यावर ढकलली जाते. पंजाबराव देशमुखांनी याच धोक्याची पूर्वसूचना दिली होती. शेतीला बाजाराच्या भरवशावर सोडले, तर शेतकरी उद्ध्वस्त होईल, हे त्यांनी केव्हाच ओळखले होते. आजचे अपयश धोरणे आहेत पण दिशा नाही. केवळ घोषणा नव्हे, तर संस्थात्मक बांधणी ही त्यांची खरी ओळख होती. अमरावती येथील श्री शिवाजी शिक्षण संस्था, कृषी महाविद्यालये, संशोधन केंद्रे यांच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण तरुणांना ज्ञानाची शस्त्रे दिली. त्यांची ठाम भूमिका होती, शेती सुधारायची असेल, तर शेतकऱ्याचा मुलगा शिक्षित झाला पाहिजे. आज महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठांची पायाभरणी ज्या विचारांवर झाली, त्यामागे पंजाबराव देशमुखांची दूरदृष्टी स्पष्टपणे दिसते.

सामाजिक न्यायाचा लढवय्या, विदर्भाचा आक्रोश दिल्लीपर्यंत नेणारा आवाज आणि सत्तेत असूनही सत्तेला प्रश्न विचारणारा नेता पंजाबराव देशमुख हे काँग्रेसचे नेते होते; पण ते कुठल्याही पक्षाचे गुलाम नव्हते. शेतकरी, कष्टकरी आणि ग्रामीण समाज यांच्याशी अन्याय होत असेल, तर सत्तेला प्रश्न विचारण्याचे धैर्य त्यांनी कायम राखले. सत्तेतील असमतोल, शेतकऱ्यांवरील अन्याय आणि धोरणात्मक त्रुटींवर त्यांनी स्वतःच्या सरकारलाही जाब विचारला. त्यांचा राजकारणाचा पाया नीती, अभ्यास आणि लोकहित या तीन स्तंभांवर उभा होता. म्हणूनच ते सत्तेत असतानाही जनतेचेच राहिले. आजचे राजकारण पक्षनिष्ठेच्या बेडीत अडकलेले असताना, पंजाबराव देशमुखांचे राजकारण लोकनिष्ठेचे होते. म्हणूनच ते मंत्री असूनही जनतेपासून दुरावले नाहीत.

विदर्भातील कोरडवाहू शेती, सततची नापिकी, सावकारशाही आणि सरकारी उदासीनता या सगळ्यांचे जळजळीत वास्तव पंजाबराव देशमुखांनी जवळून पाहिले होते. त्यामुळेच त्यांचे राजकारण एअरकंडिशन्ड खोल्यांत बसून घडलेले नव्हते, तर मातीशी जोडलेले, शेतकऱ्याच्या घामाने ओले झालेले होते. आज विदर्भ शेतकरी आत्महत्यांचा केंद्रबिंदू ठरतो आहे, हे पाहता प्रश्न पडतो, पंजाबराव देशमुखांचे विचार अंमलात आले असते, तर आज ही दुर्दैवी स्थिती आली असती का? आजचा शेतकरी कर्जबाजारी आहे, शेती अनिश्र्चित आहे, बाजारव्यवस्था अस्थिर आहे. अशा वेळी पंजाबराव देशमुखांचे विचार केवळ स्मरणात ठेवण्याचे नव्हे, तर धोरणांमध्ये उतरवण्याचे आहेत. शेतकऱ्याला सन्मान, शेतीला शाश्र्वतता आणि ग्रामीण भागाला समृद्धी हे स्वप्न अजून अपूर्ण आहे. पंजाबराव देशमुख यांचा वारसा म्हणजे केवळ इतिहास नव्हे, तर आजच्या शासनासाठी जबाबदारीची जाणीव हाचा आजच्या धोरणकर्त्यांसाठी आरसा आहे.

पंजाबराव देशमुख हे नाव म्हणजे, शेतीला आणि शेतकऱ्याच्या घामाला प्रतिष्ठा देणारा विचार, शेतीला आणि शेतकऱ्याला स्वाभिमान राष्ट्रउभारणीच्या केंद्रस्थानी ठेवणारी दृष्टी आणि राजकारणाला मूल्यांची नैतिक धार देणारा आदर्श. आज जेव्हा शेतकरी पुन्हा एकदा संकटात आहे व आत्महत्येच्या उंबरठ्यावर उभा आहे, शेती तोट्यात गेली आहे आणि कृषी धोरणे कागदावरच अडकून पडली आहेत, तेव्हा पंजाबराव देशमुखांची आठवण ही केवळ इतिहासाची पाने उलटणे नसून, आजच्या अपयशी व्यवस्थेवर टाकलेला कठोर प्रश्नचिन्ह आहे. पंजाबराव देशमुखांची आठवण ही केवळ श्रद्धांजली नसून, नव्या लढ्याची प्रेरणा ठरली पाहिजे. आजच्या धोरणकर्त्यांनी जर खरोखरच शेतकऱ्याचे भले करायचे असेल, तर पंजाबराव देशमुखांचा अभ्यास करावा लागेल, फक्त इतिहास म्हणून नव्हे, तर मार्गदर्शक म्हणून.

पंजाबराव देशमुखांचा वारसा फक्त स्मारकापुरता मर्यादित नको. आज त्यांच्या नावाने विद्यापीठे आहेत, पुतळे आहेत, जयंती-स्मृतिदिन आहेत; पण प्रश्न असा आहे, त्यांचे विचार धोरणांत आहेत का? शेतकऱ्याचा सन्मान, शेतीची शाश्र्वतता आणि ग्रामीण समृद्धी, हे त्रिसूत्री ध्येय अजूनही अपूर्ण आहे. केवळ श्रद्धांजली देऊन पंजाबराव देशमुखांचा वारसा जपला जाणार नाही; तर तो अंमलात आणावा लागेल. त्यांचा जन्मदिवस २७ डिसेंबर रोजी कृषि आणि शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या योगदानाला आदराने स्मरणार्थ साजरा केला जातो. संत गाडगेबाबांनी कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सोबत संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षणाची आघाडी उघडली आणि आज प्रगत महाराष्ट्र घडविला आहे. अशा या थोर शिक्षणमहर्षीला १२७ व्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन !

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

# चलो बुद्धगया,नेपाळ धम्म सहल.

भगवान गौतम बुद्धाच्या पदस्पर्शाने बुद्धांनी पंचवीस वर्ष वर्षावास केलेला



पवित्र असलेल्या ठिकाणाची धम्म सहल मंगल मैत्री ग्रुप तर्फे १ किंवा २ मे २०२६ मध्ये १२ दिवस सुवर्णसंधी.अतिशय कमी खर्चात धम्म यात्रा सहल १५५०० प्रति व्यक्ती,धम्मयात्रा सहल कल्याण स्टेशन व भुसावळ स्टेशन येथून निघणार आहोत.फक्त ५००० रुपये भरून आजच बुकिंग करा उर्वरित रक्कम पैकी ७००० रुपये रेल्वे रिझर्वेशन झाल्यानंतर व राहिलेले ३५०० रुपये यात्रेला निघण्याच्या ३० दिवस अगोदर आयोजकाकडे जमा करावे.

ऐतिहासिक धम्म स्थळे-१) सारनाथ:-( उत्तर) प्रदेश भगवान बुद्धांनी पंचवर्गीय भिक्कू ना दिलेला प्रथम उपदेश, श्रीलंका बुद्ध विहार,चायना बुद्ध विहार,४० फूट बुद्धमूर्ती,जापनीक बुद्ध विहार, कोरिया बुद्ध विहार,२) वाराणसी:- गंगा घाट,३) बुद्धगया:-(बिहार) भगवान गौतम बुद्धांना ज्ञान प्राप्तीचे ठिकाण,बोधिवृक्ष,महाबोधी बुद्ध विहार,थायलंड बुद्ध विहार,श्रीलंका बुद्ध विहार,बुद्ध विहार,भूतान बुद्ध विहार,४) सुजाता महल:- भगवान गौतम बुद्धांना सुजाताने खीर दान दिलेले ठिकाण,५) डयुंगेश्र्वरी पर्वत सहा वर्ष खडतर तपस्या केलेले ठिकाण,६) राजगीर:-विश्र्वशांती स्तूप,जापनिक बुद्ध विहार,वेळूवन,७) नालंदा विश्र्व विद्यापीठ बिहार,८) वैशाली (बिहार)१०,००० शिष्यांना भगवान गौतम बुद्धांनी उपदेश केलेले ठीकाण,अशोक स्तंभ,९) केसरिया स्तूप (बिहार) भगवान गौतम बुद्ध येथे आरामासाठी थांबले होते,जगाचा सर्वात मोठा स्तुप,१०) कुशीनगर (उत्तर प्रदेश) भगवान बुद्धाचे महापरिनिर्वानाचे ठिकाण,म्यानमार पॅगोडा,चायना बुद्ध विहार.११) लिंबुनी (नेपाळ)भगवान गौतम बुद्धाचे जन्मस्थळ,कपिल वस्तू ,इंडिया गेट.१२) श्रावस्ती भगवान गौतम ठिकाण.१३) लखनऊ उत्तर प्रदेश डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक.

धम्मयात्रेमध्ये मिळणाऱ्या सुविधा-रेल्वे प्रवास स्लीपर क्लास,बस प्रवास एसी लक्झरी मुक्कामाची सोय हॉटेलमध्ये (प्रति रूम चार व्यक्ती) भोजन:-दोन वेळा चहा, सकाळी नाष्टा, दुपारी व रात्री जेवण व्हेज, नॉनव्हेज,मुक्कामाच्या ठिकाणी स्वच्छ पिण्याचे (पाणी बॉटल नाही) उपलब्धतेनुसार भंतेजीचे मार्गदर्शन,प्रथमोपचार नियम व अटी-कोणत्याही सबबी खाली डव्हान्स रक्कम परत मिळणार नाही.

आपल्या मौल्यवान वस्तू आपले आरोग्य आणि जीविताची जबाबदारी स्वतःवर राहील.

पहिल्या दिवशी बस मध्ये ज्या सीटवर आपण बसले त्याच सीटवर शेवटच्या दिवसापर्यंत बसावे लागेल.रेल्वे रिझर्वेशन झाल्यानंतर आपले आधार कार्ड झेरॉक्स व एक फोटो आयोजनाकडे जमा करावा. सहलीमध्ये बदल करण्याचा अधिकार आयोजकाला राहील.

आयोजक:-आयु सुनिल इंगळे उल्हासनगर ९०२२०६७८०९,आयु. निंबाजी इंगळे वडणेर भोलजी-९९२२५१३१४३,आयु.भागवत दाभाडे,वडणेर भोलजी-९८६०९५३६००,आयु.अनंतराव शेंगावकर ९७६६९११७६५,धम्म सहलीला येण्यासाठी ईच्छुक असलेल्या धम्म बंधू आणि भगिनीं यांनी आपलें नाव व वय आणि शहर,गाव नाव वरील लिस्ट प्रमाणे टाकावे म्हणजे आयोजकांना पुढील नियोजन करण्यास सोपे जाईल धन्यवाद

जयभिम नमो बुध्दाय.

**आयु सुनिल इंगळे उल्हासनगर**
**९०२२०६७८०९**

# झाला विधी, द्या निधी, पुन्हा कधी? म्हणणारे दयानंद बगाडे गुरुजी गेले!

काही मानस आपल्या आचरण व बोलण्याने दिलखुस व्यक्तिमत्वाने ओलखलेले जातात. त्यात झाला विधी, द्या निधी, पुन्हा कधी? अशा पध्दतीने आपल्याच पेशावर मिश्किल टिपण्णी करणारे ७४ वर्षाचे तरुणांना लाजविल अशी धडपड करणारे निष्ठावंत बौध्दाचार्य दयानंद बगाडे गुरुजी यांचे आज सकाळीच निद्रेमध्ये निधन झाले. पुढच्याच पाच,सहा दिवसांत त्यांची पंचाहत्तरी सुमेध जाधव व आम्ही मित्रांनी साजरी करायचे ठरवले होते.पण त्या आधीच त्यांनी क्झिट घेतली.आरोग्य ठीक नसतांना ही ५/६ डिसेंबर ला शिवाजी पार्क च्या प्रत्येक बूक स्टॉलवर आवर्जून भेट घेत होते.त्यांना सागर तायडे,चंद्रकांत गमरे यांनी विचारले गुरुजी तबेत ठीक नसतांना अशा गर्दीच्या ठिकाणी योग्य नाही असे म्हणल्यावर ते म्हणाले बायको हेच म्हणत होती. मी तिला सांगितले मी घरात मेलो तर तू एकटीच रडशील शिवाजी पार्क वर मेलो तर इतिहास नांव लिहले जाईल.तीस वर्ष दरवर्षी महापरिनिर्वाण दिनाला आलेल्या ७४ वर्षाच्या बौध्दाचार्यचे दुखद निधन. नंतर नांव येईल दयानंद बगाडे गुरुजी.



ही बातमी आमच्या उठाव साहित्य मंचासाठी अत्यंत दुःखद आणि धक्कादायक आहे. कारण बगाडे गुरुजी हे आमच्या उठावचे कायमस्वरुपी हक्काचे सदस्य होते. उठावचा कोठेही कार्यक्रम असो,बगाडे गुरुजी तेथे पोहोचणार म्हणजे पोहोचणारच. गुरुजी हे चोखंदळ असे प्रभावी प्रवचनकार होते.आमच्या कवितांचा ते आपल्या प्रवचनात मुक्तपणे वापर करत असत.स्वच्छ शुभ्र सदरा,सफेद लेंगा व खांद्यावर काषाय रंगाची शबनम,हा गुरुजींचा नेहमीचा पेहराव. स्वभाव बंडखोर.सतत तरुण मुलांबरोबर उठणं, बसणं.त्यामुळेच त्यांचे समवयस्क नेहमीच त्यांच्यापासून चार हात लांबच असायचे.सतत तरुण मुलांबरोबर वावरणारा हा चाकोरीबाहेरचा अवलिया होता.

माझ्या वडिलांच्या व माझ्या आईच्या पुण्यानुमोदनचा कार्यक्रम बगाडे गुरुजींनीच केला होता.त्यावेळेस आमच्या मोरे परिवारातील सर्व तरुण,तरुणींना मंचावर सभोवती बसून त्यांनी त्यावेळेस हा पुण्यानुमोदनचा विधी केला होता,हे विशेष.नुकताच उठाव साहित्य मंचाच्या मासिक कविसंमेलनात त्यांचं प्रमुख वक्ता म्हणून आम्हाला मार्गदर्शन झालं होतं.अत्यंत मिलनसार,हसतमुख व आंबेडकरी चळवळीची अत्यंत सजग जाणीव असणारं एक मोठं व्यक्तिमत्व आपल्यातून निघून गेलं आहे.सुमेध जाधव,विवेक मोरे,बबन सरवदे यांच्या सह शहिद भागवत जाधव स्मृती केंद्र व उठाव साहित्य मंचाच्या वतीने दयानंद बगाडे गुरुजींना विनम्र अभिवादन!.

**विवेक मोरे**

# निसर्गाच्या संहारावर विकासाच्या वाटा.... निसर्ग रक्षणासाठी शास्वत पर्यायांची गरज

आज एकविसाव्या शतकात भारत विकासाच्या वाटेवर वेगाने पुढे जात आहे, असे आपण मानतो. औद्योगिकीकरण, रस्ते, शहरांचे विस्तारीकरण, धार्मिक सोयी, पर्यटन प्रकल्प – हे सर्व विकास या एका शब्दाखाली गुंडाळले जात आहेत. पण याला खऱ्या अर्थाने विकास म्हणता येणार नाही.कारण याला शास्वततेची जोड नाही. आज अरावली पर्वतरांगांची ओळख पुसली जात आहे. मुंबईतील किनारपट्टी वाचवणारी, समुद्राच्या लाटापासून शहराचे संरक्षण करणारी कांदळवने (चरपर्सीेश ऋेीशीीी) कोस्टल रोडसाठी तोडण्याचा निर्णय हल्लीच घेण्यात आला. कुंभमेळ्यासारख्या पवित्र धार्मिक सोहळ्याच्या नावाखाली तपोवनातील वृक्षतोड करण्याचे निर्णय घेतले गेले. दुर्दैव म्हणजे असे हे निर्णय केवळ सरकारच नाही तर न्यायालयांच्या परवानगीने घेतले जात आहेत.मग प्रश्न पडतो पर्यावरण, शाश्र्वतता आणि भावी पिढ्यांचा विचार कुठे आहे?याच्या उदाहरणादाखल नुकताच अरावली पर्वतरांगासाठी न्यायालयाने दिलेला निर्णय... अरावली केवळ डोंगर नाही, तर उत्तरी राज्यांची ६७० किलो मीटर लांबीची जीवनरेषा आहे. गुजरातपासून दिल्लीपर्यंत पसरलेली अरावली पर्वतरांग ही केवळ भूगोलाची रचना नाही तर जैवविविधता आणि इतिहास संरक्षित ठेवणारी नैसर्गिक संरचना आहे. ती उत्तर भारतातील भूजलसाठा, हवामान संतुलन आणि वाळवंटीकरण रोखणारी नैसर्गिक भिंत आहे अनेक प्रकारच्या प्राण्यांचे अधिवास आहे.तिचे पुनर्निर्धारण (ीशवशषळपळींळेप) करून, खाणकाम व बांधकामासाठी खुले करणे म्हणजे नैसर्गिक सीमांना ओलांडून भविष्यातील आपत्तींना आमंत्रित करणे होय. दूसरे उदाहरण म्हणजे, मुंबईसारख्या सागरी किनारपट्टीवरच्या महानगराच्या विकासासाठी कांदळवने नष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला कांदळवने पर्यावरणासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत, कारण ती किनारी भागांची धूप थांबवतात, वादळांपासून संरक्षण देतात, माशांसाठी प्रजननस्थळ बनतात, जैवविविधता टिकवतात आणि कार्बन शोषून हवामान बदलाचा सामना करण्यास मदत करतात, ज्यामुळे किनारी परिसंस्थेचे रक्षण होते. कांदळवने ही सागरी किनारपट्टीची नैसर्गिक ढाल आहे. ती समुद्राची पातळी वाढणे, चक्रीवादळे, त्सुनामी, पूर यांचा परिणाम कमी करतात. कांदळवने ही केवळ झाडे नसून ती किनारपट्टीचे 'शिलेदार' आहेत, जे पर्यावरण आणि मानवी जीवन दोन्हीसाठी आवश्यक आहेत आणि आज काही किलोमीटरचा रस्ता बांधण्यासाठी हजारो वर्षांत तयार झालेली परिसंस्था नष्ट करण्याचा आततायी निर्णय घेणे म्हणजे विकास नव्हे, तर आत्मघातकी धोरण आहे.मागील काही काळापासून नेहमी धर्म विरुद्ध निसर्ग असा विरोधभास का निर्माण होतो आहे? कोणताच धर्म निसर्गाच्या नाशाचे समर्थन करत नाही... निसर्ग जपणे हाच खरा धर्म नाही का? पंचमहाभूतांचे अस्तित्व ईश्र्वरीय नाही का? हिंदू धर्मातील पवित्र मानला जाणारा कुंभमेळा हा आध्यात्मिकतेचा, शुद्धतेचा आणि संयमाचा उत्सव आहे. मग त्यासाठी हजारो झाडे तोडणे, नदीकाठ उद्ध्वस्त करणे हे कोणत्या धर्मात बसते? हा ईश्र्वराचा अपमान नाही का? मानवी जीवनात शिस्त स्थापन करणारी आपली न्यायालये ही संविधानाची आणि नागरिकांच्या मूलभूत हक्कांची रक्षक आहेत. स्वच्छ हवा, पाणी आणि सुरक्षित पर्यावरण हा देखील प्रत्येक जीवन जगणाऱ्याचा मूलभूत हक्क आहे. मग हा हक्क बळकावण्याचा अधिकार मानवाला कोणी दिला? इतर जीवसृष्टीसाठी मानवाने काही कर्तव्यांचे पालन करायला हवे. मग पर्यावरणविरोधी प्रकल्पांना परवानगी देताना या जीवसृष्टीचा विचार का केला जात नाही... टिकाऊ पर्याय, पर्यावरणीय भरपाई किंवा पर्यायी जागा यांचा आग्रह का धरला जात नाही? खरंच शाश्र्वत निर्णय शक्य नाहीत का? हो, नक्कीच शक्य आहेत. रस्ते शास्वत पर्यायाने उभारता येऊ शकतात, तपोवनातील झाडे वाचवून कुंभमेळ्याचे नियोजन करता येते, या सारख्या मोठ्या धार्मिक कार्यक्रमांसाठी पर्यायी जागा विकसित करता येतात. फक्त इच्छाशक्ती आणि दूरदृष्टीची गरज आहे. आज आपण गप्प बसलो, तर उद्या उत्तर द्यावे लागेल. आज असंवेदनशीलता दाखवली तर उद्या पाण्याची टंचाई, उष्णतेच्या लाटा, पूर आणि आरोग्याच्या समस्या आपल्याला भेडसावतील आणि भावी पिढी आपल्याला यासाठी जाब विचारतील. तेव्हा दोष देण्यासाठी सरकार, न्यायालय किंवा व्यवस्था पुरेशी ठरणार नाही – कारण समाज म्हणून आज आपण मौन पाळून यासाठी तेवढेच जबाबदार असणार आहोत. विकास हवा, पण निसर्गाचा बळी देऊन नव्हे. धर्म हवा, पण पर्यावरण उद्ध्वस्त करून नव्हे. निर्णय घ्यायचे असतील, तर ते भावी पिढ्यांचा विचार करून घ्यायला हवेत. आज गरज आहे ती शाश्र्वत, संवेदनशील आणि जबाबदार निर्णयांची. कारण निसर्ग नष्ट झाला, तर कोणताही विकास टिकणार नाही. थोडक्यात काय तर जैवविविधता आणि निसर्गाचे संवर्धन करुन विकासाच्या वाटेवर चालणे काळाची गरज आहे.

**- डॉ.दीप्ती ढेरे-काळे**
**सहाय्यक प्राध्यापक सूक्ष्मजीवशास्त्र विभाग**
**दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर**

# काशीदवाडी येथे भर दिवसा घराचे कुलूप तोडून सोन्यासह २ लाख २३ हजार ९०० रुपयांचा ऐवज केला लंपास

केज/प्रतिनिधी-केज तालुक्यातील काशीदवाडी येथे भर दिवसाच एका घराचे कुलूप तोडून सोन्यासह २ लाख २३ हजार ९०० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आले असून अज्ञात व्यक्तीविरुद्ध केज पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याबाबतची सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्यातील काशिदवाडी येथील ऊसतोड मजुराचे भरदिवसा घर फोडून घरातील कपाटात ठेवलेले १ लाख ९३ हजार ९०० रुपये किंमतीचे सोन्याच्या दागिन्यासह नगदी ३० हजार रुपये असा एकूण २ लाख २३ हजार ९०० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. काशीदवाडी येथील ऊस तोडण्यासाठी ऊसतोड मजूर म्हणून सुनील साहेबराव जाधवर व त्यांची पत्नी, भाऊ, भावजयीसह मागील दोन ते अडीच महिन्या पूर्वी सोलापूर येथील सिद्धनाथ साखर कारखान्यास ऊस तोडणीसाठी गेलेले आहेत.

जाधवर कुटुंब हे ऊस तोडणी साठी केले असल्यामुळे सध्या त्यांच्या गावी त्यांचे आई-वडील व त्यांची वृद्ध आजी राहत आहेत.

दिनांक २२ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी त्यांचे आई-वडील हे जनावरांना चारण्यासाठी शेतात घेऊन गेले होते. सुनील जाधवर यांच्या घरी कोणीच नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. सुनील जाधव यांच्या घरातील दोन्ही कपाट तोडून कपाटात ठेवलेले १ लाख ९३ हजार ९०० रुपये किंमतीचे ९ ग्रॅमचे दोन मणी मंगळसूत्र, १२.५ ग्रॅमचे दोन मणी गंठण, १२.५ ग्रॅमचे दोन झुंबर जोड, ६.५ ग्रॅमचे सेवनपीस, ३ ग्रॅमच्या कानातील सोन्याच्या काड्या व नगदी ३० हजार रुपयांची रक्कम असा एकूण २ लाख २३ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल घेऊन चोरट्यांनी पोबारा केला.

केज पोलीस ठाणे येथे सुनील काशीद यांच्या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्यां विरुद्ध गु.र.नं. ७०२/२०२५ भा न्या सं ३०५ (अ), ३३२ (३) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटनेचा पुढील तपास पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक उमेश निकम हे करीत आहेत.

# वीर बाल दिवस' हा ऐतिहासिक आदर्श, सर्वोच्च बलिदानाचा स्मरण दिवस-प्रा. डॉ. मनोहर चपळे

लातूर -पूज्य साहेबजादा बाबा अजितसिंहजी, बाबा जुझार सिंहजी, बाबा जोरावर सिंहजी, आणि सरदार बाबा फतेहसिंह जी यांनी दिलेल्या सर्वोच्च बलिनादानाचा दिवस म्हणजे वीर बाल दिवस असून तो येणाऱ्या पिढीसाठी आदर्श, प्रेरणा आहे असे प्रतिपादन महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयातील हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोहर चपळे यांनी केले. ते महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित वीर बाल दिवसाप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.



या कार्यक्रमा च्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.आनंद शेवाळे हे होते तर कार्यक्रमास प्रा. डॉ. विजयकुमार ढोले, प्रो.डॉ. धीरज ह्वते ,डॉ. एस. एम. गायकवाड, डॉ. सदाशिव दंदे, डॉ. दीपक चाटे,डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. शिवप्रसाद डोंगरे कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे , यशपाल ढोरमारे, महादेव स्वामी, अजय गायकवाड, सय्यद जलील, गुरुप्रसाद बिराजदार आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. मनोहर चपळे म्हणाले की, 'वीर बाल दिवस' दशम गुरु दशमेश श्री गोविंद सिंह जी यांचे पुत्र चार साहेबजादे बाबा, अजीतसिंहजी, बाबा जुझार सिंहजी, बाबा जोरावर सिंहजी बाबा फतेह सिंहजी यांच्या सर्वोच्च बलिदानाच्या स्मरणात साजरा केला जातो. सर्वात धाकटे साहेबजादे यांच्या बलिदानाचे स्मृतिदिन म्हणून ही तारीख निवडण्यात आली आहे. जरी चौघे ही बलिदानी झाले असले तरी २६ डिसेंबर हा दिवस सहा व नऊ वर्षाच्या कोवळ्या साहेबजादे बाबा जोरावर सिंहजी व बाबा फतेहसिंहजी यांच्या बलिदानाचा दिवस आहे. वीर साहेबजाद्यांचे बलिदान देशातील बालकांसाठी आणि युवकांसाठी धैर्य ,निष्ठा, नीतिमूल्ये, आत्मसन्मान व देश भक्तीची भावना निर्माण करण्यासाठी सदैव प्रेरणादायी राहील असेही ते म्हणाले. या वेळी त्यांनी मुघलांचे अत्याचार व गुरूंनी दिलेल्या बलिदांनाचे विवेचन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे म्हणाले की,

गुरु गोविंदसिंहजी यांचे चार सुपुत्र साहेब जादे बाबा अजित सिंहजी, बाबा झुंजारसिंहजी बाबा जोरावर सिंहजी बाबा फतेह सिंहजी यांनी धर्म, स्वातंत्र्य, सत्य, न्यायाच्या रक्षणासाठी अलौकिक शौर्याने बलिदान दिले

हा दिवस देशासाठी अद्वितीय शौर्याचे प्रतीक मानले पाहिजे. येणाऱ्या असंख्य पिढ्यासाठी हा दिवस अत्यंत प्रेरणादायी आहे असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नामदेव बेंदरगे यांनी केले व आभार प्रदर्शन कार्यक्रमाधिकारी डॉ. शिवप्रसाद डोंगरे यांनी मानले.

# राज्यस्तरीय शालेय रस्सीखेच स्पर्धेत मुकुंदराज विद्यालयातील मुलींच्या संघाचे घवघवीत यश



लातूर - राज्य शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद नांदेड व जिल्हा टग ऑफ वार असोसिएशन नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय शालेय टग ऑफ वार (रस्सीखेच) स्पर्धेत मुकुंदराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नांदगाव येथील १७ वर्षांखालील मुलींच्या संघाने उत्कृष्ट आणि दमदार खेळाचे प्रदर्शन करत तृतीय क्रमांक पटकावत ब्रांझ मेडल व ट्रॉफी मिळवली आहे.

राज्यस्तरीय शालेय टग ऑफ वार (रस्सीखेच) स्पर्धा दि. १७ डिसेंबर रोजी नांदेड येथील सिडको परिसरातील तालुका क्रीडा संकुल येथे उत्साहात पार पडली. या मुकुंदराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुलींच्या संघाने कडव्या स्पर्धेत सातत्यपूर्ण खेळ करत तृतीय क्रमांक मिळवला आहे.

ग्रामीण भागातून आलेल्या या संघाच्या सातत्यपूर्ण यशामुळे हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे की, खेळाला कोणतीही सीमा नसून इच्छाशक्ती, मेहनत आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर मोठी उंची गाठता येते.

या स्पर्धेसाठी प्रशिक्षक व मार्गदर्शक शेप बी. एम., इरशाद शेख तसेच क्रीडा शिक्षक व्ही. जी. ढाकणे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या योग्य प्रशिक्षणामुळे व खेळाडूंच्या मेहनतीमुळे हे यश साध्य झाले.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. हनुमंत कराड, कार्यकारी संचालक प्रा. तेजस कराड, मुख्याध्यापक श्री. मुंढे तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी विजेत्या खेळाडू व प्रशिक्षकांचे हार्दिक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारा'ने देशातील वीस मुलांचा सन्मान; महाराष्ट्राच्या अर्णव महर्षीचा समावेश

नवी दिल्ली : वीर बालदिनाचे औचित्य साधून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज देशातील २० मुलांना प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्काराने(२०२५) सन्मानित करण्यात आले.




विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील कामगिरीसाठी छत्रपती संभाजी नगर येथील अर्णव महर्षीला गौरविण्यात आले.

महिला व बालविकास मंत्रालयातर्फे राष्ट्रपती भवनातील सांस्कृतिक केंद्रात आयोजित समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सात क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी देशभरातील २० बालकांना २०२५ या वर्षासाठीचे प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार प्रदान केले.

शौर्य, विज्ञान-तंत्रज्ञान, कला-संस्कृती, समाजसेवा, क्रीडा आणि पर्यावरण अशा क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल या बालकांना गौरविण्यात आले. यापैकी दोघांना मरणोत्तर हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या पुरस्कारार्थींमध्ये मध्ये ९ मुले आणि ११ मुलींचा समावेश आहे. यावेळी केंद्रीय महिला व बाल विकास मंत्री अन्नपूर्णा देवी, राज्यमंत्री सावित्री ठाकूर आणि मंत्रालयाचे सचिव अनिल मलिक उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या अर्णव महर्षीचा गौरव- महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर येथील १७ वर्षीय अर्णव महर्षी यास विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानासाठी प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार' प्रदान करण्यात आला. लकवाग्रस्त रुग्णांच्या हातांसाठी -ख-आधारित पुनर्वास उपकरण आणि ॲक्टिव्ह हँड रिस्ट बँड तयार करणाऱ्या अर्णव महर्षी याने स्मार्टफोन किंवा लॅपटॉपच्या मदतीने हे नवोन्मेषी उपकरण विकसित केले आहे.

या पुरस्काराचे स्वरूप पदक, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे आहे.

पुरस्कृत बालक भारताच्या अमृत पिढीचे प्रतिनिधी : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

'राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन करून ही बालके भारताच्या अमृत पिढीचे खरे प्रतिनिधी आहेत. शारीरिक, मानसिक, आर्थिक आणि इतर आव्हानांवर मात करून शौर्य, कला-संस्कृती, पर्यावरण, नवाचार, विज्ञान, समाजसेवा व क्रीडा अशा विविध क्षेत्रांत त्यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. हा पुरस्कार युवा पिढीतील शौर्य, धैर्य आणि संवेदनशीलतेला प्रोत्साहन देणारा ठरेल, असे त्यांनी सांगितले.

या मुलांच्या संकल्प आणि प्रयत्नांमुळे २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न साकार होईल असा विश्र्वास राष्ट्रपती यांनी यावेळी व्यक्त केला.

इतर पुरस्कार विजेत्यांची नावे

व्योमा प्रिया - शौर्य - तमिळनाडू (मरणोत्तर)
कमलेश कुमार - शौर्य - बिहार (मरणोपरांत)
मोहम्मद सिडान पी - शौर्य - केरळ
अजय राज - शौर्य - उत्तर प्रदेश
एस्थर लालदुहोमि - कला संस्कृती - मिझोरम
सुमन सरकार - कला संस्कृती - पश्र्चिम बंगाल
पूजा - पर्यावरण - उत्तर प्रदेश
शवन सिंह - सामाजिक सेवा - पंजाब
वंश तायल - सामाजिक सेवा - चंदीगड
आइशी प्रिशा - विज्ञान तंत्रज्ञान - आसाम
अर्णव महर्षि - विज्ञान तंत्रज्ञान - महाराष्ट्र
शिवानी उपारा - क्रीडा - आंध्र प्रदेश
वैभव सूर्यवंशी - क्रीडा - बिहार
योगिता मंडावी - क्रीडा - छत्तीसगड
लक्ष्मी प्रगयिका - क्रीडा - गुजरात
ज्योति - क्रीडा - हरियाणा
अनुष्का कुमारी - क्रीडा - झारखंड
धिनिधि देसिंगु - क्रीडा - कर्नाटक
ज्योषणा सबर - क्रीडा - ओडिशा
विश्र्वनाथ कार्तिके - क्रीडा - तेलंगणा

# मानवतेच्या मार्गावर चालण्यासाठी कृतीतून संकल्प करूया - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

मुंबई : शीख पंथीयांचे दहावे गुरू श्री गुरु गोविंद सिंगजी यांचे सुपुत्र साहिबजादे बाबा जोरावर सिंग (वय ९ वर्षे) आणि साहिबजादे बाबा फतेह सिंग (वय ७ वर्षे) यांच्या अद्वितीय शौर्य व बलिदानाच्या स्मरणार्थ २६ डिसेंबर हा दिवस 'वीर बाल दिवस' म्हणून पाळला जातो. वीर बाल दिवसाच्या निमित्ताने गुरूंनी दाखविलेल्या मानवतेच्या मार्गावर चालण्यासाठी आणि त्यांच्या विचारांना आपल्या जीवनात अंगीकारण्यासाठी आपण स्वतःला कृतीतून संकल्पित केले पाहिजे. साहिबजाद्यांच्या धैर्याने आणि बलिदानाने भारतीय इतिहासाला नवी दिशा दिली असून, त्यांचे शौर्य सदैव पिढ्यान्पिढ्यांना प्रेरणा देत राहील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

सायन येथील गुरूद्वारा गुरू तेग बहादूर दरबार येथे वीर बाल दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वीर शहीद साहिबजादे यांना विनम्र अभिवादन करून त्यांच्या अद्वितीय शौर्याचे स्मरण केले. यावेळी गुरूद्वारा समितीच्या सदस्यांनी किर्तन, कविता वाचन केले आणि वीर शहीद साहिबजादे यांना आदरांजली अर्पण केली.यावेळी आमदार प्रसाद लाड, आमदार तमिल सेल्वन, श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागम समितीचे राज्यस्तरीय समन्वयक रामेश्र्वर नाईक, पंजाबी साहित्य अकादमीचे कार्याध्यक्ष बल मलकित सिंह, गुरुद्वारा समितीचे सदस्य दलजीत सिंग, गुरुदेव सिंग, जसपाल सिंग सिद्धू, हॅपी सिंग, डॉ. अजयसिंग राठोड यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी बल मलकीत सिंग यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत केले. शासनाच्या पुढाकाराने गुरूंच्या गौरवशाली इतिहासाला उजाळा मिळत असल्याचे नमूद करून या उपक्रमासाठी बल मलकित सिंग यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे आभार मानले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राष्ट्रासाठी आपले शीश समर्पित करणाऱ्या गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या महान बलिदानाला देश कधीही विसरणार नाही. श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या संपूर्ण परिवाराने देश, संस्कृती आणि संस्कारांसाठी दिलेले बलिदान इतिहासात अजरामर आहे. २६ डिसेंबरला वीर बाल दिवस साजरा करण्याचा निर्णय महत्त्वपूर्ण आहे. गुरु तेग बहादूर यांनी शेवटपर्यंत आपले रक्षण केले असल्याने त्यांच्या इतिहास सर्वांनी कायम लक्षात ठेवावा. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, दहावे गुरू श्री गुरू गोविंद सिंगजी यांचे सुपुत्र साहिबजादे बाबा जोरावर सिंग (वय ९ वर्षे) आणि साहिबजादे बाबा फतेह सिंग (वय ७ वर्षे) यांच्या अद्वितीय शौर्य व बलिदानाचे स्मरण करण्याचा आजचा दिवस आहे. वीर बाल दिवसानिमित्त या वीर, शहीद साहिबजादांना नमन करून त्यांच्या जीवनातील दृढता, धैर्य आणि निष्ठा आपल्यातही यावी, अशी प्रार्थना आज गुरूंना करूया, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, गुरू गोविंद सिंग यांच्या संपूर्ण परिवाराने दिलेली शहादत ही देशासाठी सदैव प्रेरणादायी राहिली आहे. इतके मोठे बलिदान सहन करूनही गुरू गोविंद सिंग आपल्या उद्दिष्टापासून कधीही विचलित झाले नाहीत. सर्व शीख गुरूंनी मानवतेसाठी, धर्मस्वातंत्र्यासाठी आणि मूल्यांच्या रक्षणासाठी कसे बलिदान दिले, याचे सर्वोत्तम उदाहरण त्यांनी संपूर्ण जगासमोर ठेवले. त्या काळातील क्रौर्य इतके भयानक होते की, साहिबजादे बाबा जोरावर सिंग आणि बाबा फतेह सिंग यांसारख्या कोवळ्या वयातील बालकांनाही शहीद करण्यात आले. राज्य शासन गुरू तेग बहादूर यांचे शहीदी समागम वर्षही साजरे करीत आहे. 'हिंद दी चादर' म्हणून ओळखले जाणारे गुरू तेग बहादूर यांनी देशासाठी आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी आपले सर्वोच्च बलिदान दिले, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.गुरूबाणीच्या माध्यमातून ही महान परंपरा आजही आपल्याला जीवनाचा सन्मार्ग दाखवित आहे. गुरूंच्या विचारांतून जीवनाला अर्थ देण्याचा, मानवतेची सेवा करण्याचा संदेश सतत मिळतो. भारत देश आणि संपूर्ण मानवता कधीही या महान बलिदानांना विसरणार नाही. त्यांच्या त्यागामुळेच आज आपले अस्तित्व, पंथ, भाषा आणि संस्कृती टिकून आहे. त्यांच्या बलिदानापुढे आपण सर्वांनी नम्र होऊन नतमस्तक व्हायला हवे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी नमूद केले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी, ज्यांच्या बलिदानामुळे आपले अस्तित्व आहे, त्यांचे कायम स्मरण ठेवणे हाच यशस्वी भविष्यासाठीचा मार्ग आहे, असे सांगितले आहे. साहिबजादांच्या शौर्याच्या स्मरणार्थ 'वीर बाल दिवस' साजरा करण्याचा निर्णय घेतला. आजच्या दिवशी गुरूंना आणि त्यांच्या परिवाराच्या बलिदानाला सामूहिकरित्या स्मरण करून, मानवतेच्या रक्षणासाठी सज्ज होण्याचा आणि गुरूंच्या मार्गावर चालण्याचा संकल्प करूया. नानक, नामलेवा समाजाला जीवन जगण्याचा योग्य सन्मार्ग गुरूंमुळेच मिळाला, ही अत्यंत महत्त्वपूर्ण आणि गौरवाची बाब आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.